# भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस् कॉलेज,पिंजर
# ता.बार्शिटाकळी जि.अकोला

## झाडे लावा झाडे जगवा/ पर्यावरण संरक्षण अहवाल
## वर्ष २०२४—२५

आमच्या भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस् कॉलेज, पिंजर ची स्थापना १९९५ मध्ये झाली असून सहा एकराच्या आनंदवन परीसरात महाविद्यालय २००२ पासून स्वतंत्र रित्या कार्यरत आहे. ज्यावेळी आम्ही प्रथम २००२ मध्ये या परीसरात आलो तेव्हाच आम्ही दरवर्षी १०० झाडे लावण्याचा संकल्प केला होता. आणि त्याप्रमाणे कार्य सुध्दा केले आहे. आणि म्हणून आजरोजी आमच्या महाविद्यालयाच्या परीसरात विविध जातीची १००० पेक्षा जास्त झाडे डौलाने उभी आहेत. वृक्ष लागवडी प्रमाणे पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने वेळोवेळी वनराई बंधारे, ग्रामस्वच्छता तसेच वृक्ष वाटप व वन्यजीव सप्ताह सारखे महत्वपूर्ण कार्य केले आहे त्याचा अहवाल आम्ही पुढील प्रमाणे देत आहोत.

**वृक्ष लागवड अहवाल**

आमच्या महाविद्यालयाची स्वतंत्र नर्सरी असून आम्ही सत्र २०२४—२५ या कालावधीमध्ये काही झाडे विकत घेतली आहेत. त्याची बील सदर अहवालासोबत लावली आहेत. बाकीची झाडे आम्ही आमच्या **'अमृत'** नर्सरी मध्ये स्वत: तयार केली असून ते झाडे परीसरात लावली आहेत. आमची अमृत नावाने नर्सरी असून सदर नर्सरीची देखभाल आमच्या महाविद्यालयाचे चतुर्थश्रेणी कर्मचारी श्री.गं.का.वानखेडे पाहतात. त्यांच्या उत्तम देखरेख मुळेच महाविद्यालयात आज १००० पेक्षा जास्त झाडे आहेत. २०२४ ते २०२५ दरम्यान विकत घेतलेल्या व अमृत नर्सरीमधून लावलेल्या तसेच नागरीकांना निशुल्क वाटप केलेल्या वृक्षांचे विवरण पुढील प्रमाणे आहे.

| सत्र | **'अमृत'**नर्सरीत तयार केलेली झाडे | विकत घेतलेली झाडे | लावलेली झाडे | निशुल्क वाटप केलेली झाडे |
|---|---|---|---|---|
| २०२४—२०२५ | १९८ | १५० | २२० | १२८ |
| | | | | |
| | | | | |

तसेच महाविद्यालयाचे चतुर्थश्रेणी कर्मचारी श्री.वानखेडे यांनी अमृत नर्सरीमध्ये जवळपास २५ वनऔषधीच्या वृक्षांचे जतन केले आहे. त्याचप्रमाणे सर्वात जास्त ऑक्सीजन देणारे सर्प पौधा (स्नेक प्लॅंट) हया वनस्पतीचे त्यानी जतन केले आहे. वनऔषधीचा उपयोग विद्यार्थ्यांसोबतच गावातील नागरिक सुध्दा करतात. अशा प्रकारे महाविद्यालय आपली सामाजिक जबाबदारी पार पाडण्याचा प्रयत्न करीत आहे.

दि.१० जून ते २४ जून २०२४ या काळात जागतीक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून वृक्ष पंधरवाडा साजरा करण्यात आला. या काळात महाविद्यालय परीसरात विविध जातीच्या २०० रोपांचे वृक्षारोपन करण्यात आले. या मोहिमेच्या अंतर्गत महाविद्यालयाने पुढाकार घेवून परीसरात कडुनिंब, शिसम, साग, गुलमोहर व इंग्रजी चिंच या वृक्षांचे वृक्षारोपन केले. याची नोंद दै.तरूण भारतने दि.१३.०७.२०२४ च्या अंकात घेतली आहे.

महाविद्यालयाने पिंजर गावासोबतच परीसरातील गावामध्ये जावून सुध्दा वृक्षारोपन व वितरण कार्यक्रम घेतले आहे. तसेच दि.२२ ऑगष्ट २०२४ रोजी महाविद्यालयाच्या रासेयो विभाग व सामाजिक वनीकरण विभागाच्या पिंजर सर्कलने पंतप्रधानांच्या आवाहनाला प्रतिसाद देवून **एक पेड माँ के नाम** हा ८० कोटी वृक्ष लागवडीचा संकल्प महाविद्यालयाच्या परीसरात वृक्षारोपन व वृक्षवितरण या अभिनव उपक्रमाद्वारे पूर्ण केला. प्रादेशिक कार्यालय, अकोला येथील उपवन संरक्षक डॉ.कुमार स्वामी यांच्या कृति तत्परतेने व वनपरीक्षेत्र अधिकारी, वनरक्षक सिता भगत, एस.बी.नप्ते, आर.बी.बुरकुले व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही. सी.खारोडे, रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी एस.एम.मनवर यांनी पुढाकार घेवून ३५० झाडांचे वितरण व वृक्षरोपण केले. याची नोंद दै.तरूण भारतने दि.२४.०८.२०२४ च्या अंकात घेतली आहे.

महाविद्यालयाने उपरोक्त तारखेशिवाय दि.४ जुलै २०२४, २७ जुलै २०२४ तसेच ३१ ऑगष्ट २०२४, १मे २०२५ ला वृक्षरोपन केले आहे. वरील सर्व वृक्षरोपन चे छायाचित्र या अहवाला सोबत जोडलेले आहेतच.

**पाणी अडवा पाणी जिरवा**

दिवसागणीक भुजल पातळी ही खोल जात आहे. त्यामुळे जलसंवर्धन ही काळाची गरज आहे. महाविद्यालयाने सुध्दा सामाजिक बांधीलकीतून आपले दर्शन वेळोवेळी घडविले आहे. महाविद्यालय परीसरात सुध्दा १०X ८ आकाराचे ७ फुट खोलीचे दोन शोषखडड्े व एक २०X१२ आकाराचे ७ फुट खोलीचे शेततळे तयार केले आहे. महाविद्यालय परीसरात दोन कुपनलीका आहेत. याआधी उन्हाळयात पाणी टंचाई जानवत होती. परंतू शेततळे व शोषखडड्े केल्यानंतर भूजल पातळीत वाढ झाली असून झाडे व बगीच्याला पाणी देण्याची टंचाई जानवत नाही.

तसेच दि.२६ फेबुवारी २०२५ रोजी महाविद्यालयाच्या रा.से.यो चे दत्तक ग्राम टिटवा येथे विद्यार्थ्यांनी श्रमदानातून जलसंधारणासाठी एक मोठा बंधारा बांधला यांची दखल सुध्दा मध्ये नोंद दै.तरूण भारतने दि.४ मार्च च्या अंकात घेतली आहे.

**गावाचे पर्यावरण संवर्धन**

सामाजिक बांधीलकीचे भान ठेवून वैराग्यमुर्ती संत गाडगे बाबा यांच्या जयंती व पुण्यतीथी ला महाविद्यालयाच्या वतीने दरवर्षी ग्रामस्वच्छता केली जाते महाविद्यालय परीसर, अकोला बायपास, पिंजर पोलीस स्टेशन परीसर, बस स्थानक तसेच पिंजर मुख्य रस्त्यासह गाडगेबाबांच्या मंदीरा पर्यंतचा संपूर्ण परीसर महाविद्यालयाच्या वतीने स्वच्छ केला जातो. २ आक्टोबर हा दिवस स्वच्छ भारत दिवस म्हणून साजरा केला जातो. त्यास अनुसरून स्वच्छता ही सेवा मोहीम दि.१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२४ या पंधरवाडयात गाव स्तरावर स्वच्छतेचे जागरण करण्याकरीता राबविण्यात आली. गावातील प्रतिष्ठीत नागरीकांनी सुध्दा महाविद्यालयाच्या या स्तृत्य उपक्रमाचे कौतुक केले आहे. याची नोंद दै.तरूण भारतने दि. २५.०९.२०२४ च्या अंकात घेतली आहे.

सन २०२५ ची उन्हाची तिव्रता खुप होती पशु— पक्षांचा सुध्दा पर्यावरण संवेधनात सिंहाचा वाटा असतो. याची जाण ठेवून महाविद्यालयाने परीसरात ठिकठिकाणी पशु—पक्षांना पाणी पिण्याकरीता पाणवठे तसेच पक्षांना पिण्याकरीता पाणीभरलेले मातीचे पाणवठे झाडाला बांधण्यात आली होती.

उपरोक्त अहवाल हा सत्र २०२४—२५ मधील असून महाविद्यालयाचे पर्यावरण व वृक्ष संवेधनाचे कार्य अविरत सुरू राहील.

तरुण भारत
□□□□□ □□□□□ | 2024-07-13 | Page- 8
epaper.tarunbharat.net

# भाऊसाहेब लहाने महाविद्यालयात वृक्षारोपण करून वृक्ष पंधरवडा साजरा

◆ **पिंजर, १२ जुलै**

स्थानिक भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस् कॉलेजमध्ये दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील वृक्षारोपणासह वृक्ष संवर्धन करण्याचा उपक्रम राबविण्यात आला. प्राणवायूविना कोणाचाही प्राण जाऊ नये या उदात्त हेतूने वृक्षारोपण करून निसर्ग संवर्धनाचा वसा आणि वारसा जोपासण्याच्या हेतूने समाजहिताचा हा उपक्रम राबविण्यात आला.



वृक्ष लागवड करत असताना विजय गुल्हाने, प्रा. विलासराव देशमुख, दीपक सदाफळे

त्या अनुषंगाने या उपक्रमाची सुरुवात राष्ट्रीय सेवा योजना विभागाने केली असून महाविद्यालय परिसरात दोनशे वृक्षांची लागवड महाविद्यालयातर्फे करण्यात आली आहे. भाऊसाहेब लहाने महाविद्यालयातील स्थानिक विकास समितीचे सदस्य विजय गुल्हाने, प्रा. विलासराव देशमुख व संत गाडगेबाबा आपत्ती व्यवस्थापन आपत्कालीन पथक प्रमुख दीपक सदाफळे यांच्या हस्ते वड, चिंच, कडूनिंब व पिंपळ वृक्षांच्या लागवडीने सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी डॉ. मनोज फडणीस उपस्थित होते. वृक्षारोपण कार्यक्रम प्राचार्य व्ही. सी. खारोडे यांच्या मार्गदर्शनात राबविण्यात आला. याप्रसंगी आय. क्यु. ए. सी. समन्वयक डॉ. अशोक वाहुरवाघ, कार्यक्रम अधिकारी डॉ. रामकृष्ण गावंडे, डॉ. पंकज तायडे, ग्रंथपाल डॉ. रेखा काळबांडे, डॉ. वासुदेव भगत, प्रा. सुनील मनवर, डॉ. नानासाहेब सपकाळ, प्रा. रणजीत हिवराळे, देवानंद बाकल, संतोष गिरी, श्यामपंत खापर्डे, गोपाल घुमसे, आनंदा विजये, गंगाराम वानखेडे व विद्यार्थी उपस्थित होते. ◀(तभा वृत्तसेवा)

Powered by iDocuments




GPS Map Camera
Pinjar, Maharashtra, India
G7W3+P5C, Pinjar, Maharashtra 444407, India
Lat 20.547254°
Long 77.252876°
27/07/24 10:28 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Pinjar, Maharashtra, India
MH SH 199, Pinjar, Maharashtra 444407, India
Lat 20.549614°
Long 77.249675°
22/08/24 01:28 PM GMT +05:30
Google

तरुण भारत
□□□□□ □□□□□ | 2024-08-24 | Page- 8
epaper.tarunbharat.net

# सामाजिक वनीकरण विभागाने राबविला 'एक पेड माँ के नाम' उपक्रम



वृक्ष लागवड करताना वनपरिक्षेत्र अधिकारी, वनरक्षक सीता भगत. सोबत मान्यवर

◆ **पिंजर, २३ ऑगस्ट**

येथील ज्ञानप्रकाश कनिष्ठ महाविद्यालय, भाऊसाहेब लहाने आर्टस कॉलेजचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि सामाजिक वनीकरण विभागाच्या पिंजर सर्कलने पंतप्रधानांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन एक पेड माँ के नाम हा ८० कोटी वृक्ष लागवडीचा संकल्प महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण व वृक्षवितरण या अभिनव उपक्रमाद्वारा पूर्ण केला.

प्रादेशिक कार्यालय, अकोला येथील उपवन संरक्षक डॉ. कुमार स्वामी यांच्या कृति तत्परतेने व वनपरीक्षेत्र अधिकारी, वनरक्षक सीता भगत, एस. बी. नप्ते, आर. पी. बुरकुले यांनी पुढाकार घेऊन ३५० झाडांचे वितरण व वृक्षारोपण केले.

सर्वप्रथम महाविद्यालयाच्या सभागृहात सीता भगत यांनी विद्यार्थ्यांसमोर एक पेड माँ के नाम या उपक्रमाची माहिती सांगून वृक्ष, संवर्धनाचे व वनांचे महत्त्व विषद केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सुबोधचंद्र लहाने होते. मंचावर प्राचार्य डॉ. व्ही. सी. खारोडे, सरपंच पांडुरंग ठक, कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रभारी प्रा. अलका मुंशी हे मान्यवर उपस्थित होते.

अध्यक्षस्थानावरून बोलताना डॉ. सुबोधचंद्र लहाने यांनी स्वतः केलेल्या वृक्षसंवर्धनाची उदाहरणे विषद करून विद्यार्थ्यांसमोर आदर्श ठेवला. संचालन डॉ. अशोक वाहुरवाघ यांनी, आभार डॉ. पंकज तायडे यांनी मानले. या कार्यक्रमानंतर मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करून पंतप्रधानांच्या संकल्पाला पूर्णरूप दिले. वृक्षारोपण कार्यक्रमात ज्ञानप्रकाश कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी, विद्यार्थिनी व शिक्षक, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे अधिकारी प्रा. एस. एम. मनवर, स्वयंसेवक आणि शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

◀*(तभा वृत्तसेवा)*

Powered by iDocuments

